**मे. दिघोरी कायनाईट माईन, खसरा नं. 155, दिघोरी (मोठी), ता. लाखांदूर, जि. भंडारा यांच्या विद्यमान खाणीमध्ये क्वार्टझाईट खनिजाच्या उत्पादनामध्ये 9000 TPA वरुन 84916 TPA (विद्यमान उत्पादन काइनाइट, सिलिमॅनाइट, कॉरंडम आणि पायरोफिलाइट 4000 TPA आणि क्वार्टझाईट 9000 TPA), खनिज क्षेत्र 14.33 हेक्टर विस्तार प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त दि. 11/08/2023. वेळ सकाळी 11.00 वा.**

*******

केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण विभागाच्या अधिसूचना दि. 14.09.2006 व सुधारीत अधिसूचना दि. 01.12.2009 तरतूदीनुसार मे. दिघोरी कायनाईट माईन, खसरा नं. 155, दिघोरी (मोठी), ता. लाखांदूर, जि. भंडारा यांच्या विद्यमान खाणीमध्ये क्वार्टझाईट खनिजाच्या उत्पादनामध्ये 9000 TPA वरुन 84916 TPA (विद्यमान उत्पादन काइनाइट, सिलिमॅनाइट, कॉरंडम आणि पायरोफिलाइट 4000 TPA आणि क्वार्टझाईट 9000 TPA), खनिज क्षेत्र 14.33 हेक्टर विस्तार उत्पादनासाठी प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक 11/08/2023 रोजी दुपारी 11.00 वाजता मे. दिघोरी कायनाईट माईन, खसरा नं. 155, दिघोरी (मोठी), ता. लाखांदूर, जि. भंडारा येथे मा. योगेश कुंभेजकर (भा.प्र.से), जिल्हाधिकारी, भंडारा यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्रीमती. हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर हे म.प्र.नि.मंडळाचे प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीचे सदस्य उपस्थित होते व श्री. किशोर पुसदकर, उप-प्रादेशिक अधिकारी, भंडारा यांनी समन्वयक म्हणून काम केले. सदर जनसुनावणीस उपविभागीय अधिकारी, साकोली तसेच श्री. ठवरे, जिल्हा खनिकर्म अधिकारी उपस्थित होते. अध्यक्षांच्या संमतीने दुपारी 11.00 वाजता पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या लोकांच्या नावांची यादी सोबत जोडलेली आहे. **(सहपत्र-1).**

**पार्श्वभूमी**

मे. दिघोरी कायनाइट माइन ला सद्य:स्थितीत खाणपट्टा क्षेत्र १४. ३३ हेक्टर वर (काइनाइट, सिलिमॅनाइट, कॉरंडम आणि पायरोफिलाइट ४००० टन/वर्ष आणि क्वार्टझाईट ९००० टन/वर्ष विद्यमान उत्पादन) च्या उत्पादनासाठी राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरण, मुंबई द्वारे पत्र क्रमांक SEAC-2015/CR-106/TC-2 दि. १६ जानेवारी २०१६ द्वारे उत्पादन क्षमता १४००० टन/वर्ष साठी पर्यावरण मंजुरी प्राप्त केली आहे.
क्वार्टझाइटच्या वाढीकरिता पर्यावरण अनुमती प्राप्त करण्यासाठी पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई येथे अर्ज करण्यात आला होता. त्यानुषंगाने, राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरण, महाराष्ट्र ने पत्र क्र .SIA/MH/MIN/७१२५०/२०२२ दिनांक: २५.०१.२०२२ द्वारे TOR दिला.
काच, सिरॅमिक्स आणि इलेक्ट्रिकल उद्योगाच्या उत्पादकांकडून (जे प्रमुख ग्राहक आहेत) मागणी वाढल्यामुळे उत्पादन ९००० टन/वर्ष वरून ८४९१६ टन/वर्ष पर्यंत वाढवण्याची गरज भासली.
पर्यावरण प्रभाव मूल्यांकन अधिसूचना दिनांक १४.०९.२००६ च्या प्रकल्प/क्रियाकलाप नुसार हा प्रकल्प श्रेणी 'B1' अंतर्गत येतो.
पर्यावरण प्रभाव मूल्यांकन अधिसूचना २००६ मध्ये दिलेल्या नियमांप्रमाणे आणि प्राप्त झालेलया TOR च्या अटींच्या अधिन राहून मा. सदस्य सचिव, म.प्र.नि.मं, मुंबई आणि उप क्षेत्रीय अधिकारी, म.प्र.नि.मं., भंडारा येथे जाहीर लोकसुनावणीकरिता दिनांक २१.०३.२०२३ रोजी अर्ज करण्यात आला.

**प्रयोजन व कार्यपध्दती**

उप-प्रादेशिक अधिकारी, भंडारा यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली व जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही, असे स्पष्ट केले. या जाहीर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी मांडावयाचे आहेत त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, भंडारा यांनी भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसूचना दिनांक 14 सप्टेंबर, 2006 नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक 09/07/2023 ला दैनिक टॉईम्स ऑफ इंडिया (इंग्रजी) व दैनिक लोकमत (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना ३० दिवसाच्या मुदतीसह प्रसिध्द करण्यात आली आहे त्याबद्दल कळविले. दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या वृत्तपत्र कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-2)**.

भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या, पर्यावरण आघात मुल्यनिर्धारण अहवालाच्या संक्षिप्त विवरणाची प्रत व इतर माहिती असलेले कागदपत्रे (इंग्रजी व मराठी मध्ये) विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी परिसरातील लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. मंडळाचा आदेश क्र. ई-48/2023 पत्र क्र. BO/JD/(WPC)/PH/B-230713-FTS-0095 dtd.13/07/2023 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडलेली आहे. **(सहपत्र-3)**. सुनावणी पुर्वी १ निवेदन प्राप्त झाले असून सुनावणी दरम्यान एकुण ४१ निवेदने प्राप्त झाले व एकूण ४२ निवेदनाच्या प्रतीसोबत जोडण्यात येत आहे. **(सहपत्र-4)**.

सदर प्रकल्पाचा तसेच म.प्र.नि. मंडळाच्या संकेत स्थळावर प्रकल्पाबाबत प्रश्न, शंका, सूचना, आक्षेप, निवेदन असल्यास लेखी स्वरुपात पाठविण्याचे जाहिरातीत नमूद केले होते. कार्यकारी सारांश इंग्रजी आणि मराठीत सॉफ्ट कॉपीसह खालील कार्यालयात लोकांच्या माहितीसाठी आणि अभ्यासासाठी ठेवण्यात आला होता व याबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आले होते.

1. मा. जिल्हाधिकारी, भंडारा.
2. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा.
3. मा. व्यवस्थापक, जिल्हा उदयोग केंद्र , भंडारा.
4. उप-विभागीय अधिकारी, साकोली, जि.भंडारा.
5. तहसिलदार, तहसिल कार्यालय लाखांदूर, जि.भंडारा.
6. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, 5 वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
7. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तात्या टोपे वार्ड, सिटी पेट्रोलपंम्प जवळ, मीस्कीन टँक, महाल रोड, भंडारा.
8. पर्यावरण विभाग, 15 वा माळा, नवी प्रशासकीय इमारत, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-32.
9. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, 3 रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.8, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-22.
10. क्षेत्रिय कार्यालय (पश्चिम मध्य क्षेत्र), पर्यावरण, वने व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भू-तल, पुर्व खंड, नवीन सचिवालय भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर-01.
11. ग्रामपंचायत कार्यालय, दिघोरी (मोठी), ता. लाखांदूर, जि.भंडारा.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, भंडारा तथा समन्वयक यांनी प्रकल्प धारक श्री. विनोद भुजाडे यांना प्रकल्पाबद्दल व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकांचे तांत्रीक सल्लागार श्री. रोहीत माईणकर यांनी तपशिलवार मराठी मध्ये काइनाइट, सिलिमॅनाइट, कॉरंडम आणि पायरोफिलाइट आणि क्वार्टझाईट या उत्पादनासाठी पर्यावरण विषयक बाबींबाबत प्रकल्प परिसर, प्रस्तावित प्रकल्पाचे लाभ, प्रस्तावित सुविधा, अग्निशामक सुविधा, प्रक्रियेचे विवरण, वातावरणाची माहिती आणि अपेक्षित परिणामांची पडताळणी, जमिनीवरील घटक, वातावरण व हवामान, हवेतील घटक, परिसरातील हवेचा दर्जा, आपत्ती व्यवस्थापन योजना, हवा प्रदूषणाचे स्त्रोत, ध्वनी घटक, जल घटक, उपलब्ध पाण्याचा दर्जा, पाण्याचा वापर, सांडपाण्याची निर्मिती, जैविक घटक, सामाजिक आणि आर्थिक घटक, स्थानिक मूलभूत सोयीसुविधांवर होणार परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन योजना, हवेतील उत्सर्जन, सांडपाणी व्यवस्थापन, वनीकरण कार्यक्रम, काळजी व्यवस्थापन आणि परिक्षण या बाबींवर सादरीकरण केले.

सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, भंडारा यांनी उपस्थित जनसमुदायाला, सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सुचना, टिका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्याचे त्यांनी आपले नांव व गावाचे नांव सांगुन मुद्दे उपस्थित करावे, असे आवाहन केले.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

| अ. क्र. | नाव | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | श्री. सचिन बरवे, उपसंरपंच, रा. साखरा | प्रकल्पामध्ये स्थानिक लोकांना व युवा मुलांना जास्तीत जास्त रोजगार देण्यात यावा. कामगारांना पी.एफ. व इन्शुरंस ची सुविधा तसेच शासनाच्या नियमानुसार रोजगार मिळतो काय याबद्दल माहिती दयावी. | या खाणीमध्ये स्थानिक लोकांना प्राधान्य देण्यात येईल. |
| २ | श्री. जयश्याम कटरे, मोहगांव | या खाणीमध्ये मी मागील विस वर्षापासून काम करीत असुन ही खाण व्यवस्थित सुरू आहे. या खाणीमुळे सगळ्यांना रोजगार मिळत आहे. | समर्थन |
| ३ | श्री. मंगेश, दिघोरी (मोठी) | या खाणीमुळे कोणालाही धोका नाही, सर्व व्यवस्थित सुरू आहे. | समर्थन |
| ४ | श्री. प्रकाश रामटेके | या खाणीत मी गेल्या 15 वर्षापासून काम करीत आहे, नियमित पणे रोजगार मिळत असून माझा चरितार्थ व्यवस्थित चालु आहे. | समर्थन |
| ५ | श्री. सुनिल बारसागडे, पत्रकार, लांखादूर | या खाणीमधून निघणारे योग्य मिनरल्स हे विकतात पण रिजेक्ट झालेला मिनरल्स हे काय करणार आहेत. या खाणीमुळे आजुबाजुच्या शेतीचे खूप मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे त्या शेतकऱ्यांना काय मदत केलेली आहे, या ठिकाणी पर्यावरणाचा ऱ्हास झालेला आहे, या खाणीचे पर्यवेक्षण कोणाकडे राहील व याची तक्रार कोणाकडे करायची, उत्खननातील रिजेक्ट झालेल्या मालाचे काय करता, आतापर्यंतचे रिजेक्ट झालेल्या मालाचा साठा कुठे आहे. खाणीमुळे आजुबाजूच्या शेतात पाणी जाते तसेच धुळीचा प्रार्दुभाव त्यावर काय उपाययोजना केल्या आहेत. नियमानुसार काम करीत नसेल तर तक्रार कोणाकडे करावी. | • उत्पादन किंवा लिज करारभंगा बाबत जिल्हा खनिकर्म अधिकारी भंडारा तसेच प्रदूषणाची तक्रार उप-प्रादेशिक कार्यालय म.प्र.नि. मंडळ, भंडारा येथे करु शकता.<br>• शेतकऱ्यांना आम्ही परिपूर्ण मदत करतो. त्यांच्या शेतात पाणी जाऊ देत नाही.<br>• जास्तीत जास्त युवा लोंकाना रोजगार मिळेल.<br>• I.B.M. च्या निर्देशानुसार खाणींतून निघणारा रिजेक्शन खनिज ग्रेडनुसार विविध डंप मध्ये स्टोर करुन ठेवतो जेणेकरून भविष्यात ते कामी पडेल. काही रिजेक्शन मालावर झाडे लावण्यात आलेली आहे.<br>• रिजेक्ट मिनरल्स बाबतचे माहिती पुरविण्यात येईल. |
| ६ | श्री. खेमराज रामटेके | मला या खाणीमध्ये काम करताना 9 वर्षे झालेली आहेत. आम्हाला नियमितपणे पगार मिळतो व पगारवाढ होते, या खाणीमुळे आमचा घर चालते. | समर्थन |
| ७ | श्री. विजय खोबरागडे, उपसंरपच, दिघोरी (मोठी) | माझी सूचना आहे की या खाणीत उत्पादन वाढल्यामुळे रोजगार तसेच CSR fund देखील वाढेल तेव्हा या खाणीत स्थानिक रोजगारांनाच प्राधान्य देण्यात यावा. | या खाणीत रोजगाराकरीता स्थानिक लोकांनाच प्राधान्य देण्यात येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | श्री. सुनंदा रेड्डी | खाण व्यवस्थापनांस माझ्या शुभेच्छा आणि पाठिंबा आहे.<br>• खाण उदयोंगामुळे रोजगार मिळत असल्याने यांना परवानगी देण्यात यावी.<br>• खाण टप्प्याटप्यांमध्ये चालविण्यात यावी तसेच पर्जन्यजल संचयन व वृक्षारोपन करण्यात यावे.<br>• आजुबाजुच्या लोंकाचे आरोग्याचे स्थिती, भूजल, पिक उत्पादन स्थिती बाबत अभ्यास करण्यात यावा.<br>• स्थानिक लोंकाना नोकरीसाठी प्राधान्य देण्यात यावे.<br>• बेरोजगार तरुणांना कौशल्य विकास प्रशिक्षणाला प्रोत्साहन द्या आणि तुमच्या उदयोगात रोजगाराच्या संधी मिळण्यासाठी उपयुक्त कौशल्य वाढवा.<br>• **CSR** फंड वापरण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था व प्रशासनाच्या माध्यमातून समन्वयन समिती करण्यात यावी.<br>• हवा व जल प्रदूषणासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्या.<br>• आरोग्य शिबिरे कार्यक्रम घेण्यात यावे. | समर्थन |
| ९ | श्री. दिपक मोटघरे, दिघोरी | मी 10 ते 15 वर्षापासून या खाणीमध्ये काम करतो आहे या खाणीमुळे माझ्या 20-25 लोकांचा कुटुंब चालतो. | समर्थन |
| १० | श्री. मिताराम भगत | मी या खाणीवर सुरूवातीपासून कामाला आहे मला नियमितपणे रोजगार मिळतो. | समर्थन |
| ११ | श्री. सुनिल नंदागवळी | मी एक मजूर असून तीन वर्षापासून या खाणीवर काम करीत होतो. मी पर्यावरण विषयी कर्तव्य व जबाबदारीबाबत बोललो तर त्यावेळेस मला नियमबाह्य पध्दतीने कामावरुन काढले, माझे दोन्ही हात मोडले. या क्षेत्रामध्ये रेती तस्कर खूप मोठ्या प्रमाणात आहे. रेती तस्कर व खाण मालक माझा कधी जिव घेतील याची शाश्वती नाही. माझ्या सुरक्षेसाठी योग्य त्या उपाययोजना करा. माझ्या जीवाला धोका असून माझ्या जीवाला काही झाल्यास माझ्या कुटुंबियांना एक कोटी रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी. खाणीच्या परिसरामध्ये उतखनन केलेले खडक विखुरलेल्या स्थितीत ठेवण्यात आले आहे त्यामुळे निसर्गाला पोषक असे जीवाणू मरतात आणि त्याचा आरोग्यावर परिणाम होतो. गौण खनिजाची खूप मोठ्या प्रमाणावर चोरी होते. नियोजन बरोबर नाही ही खाण नियमानुसार नाही, येथे अवैध काम होते | |
| १२ | श्री. राजू धामनकर | मी बऱ्याच वर्षापासून या खाणीमध्ये इलेक्ट्रेशियनचे काम करीत आहे. माझे सर्व कुटुंब | समर्थन |

| | | | |
|---|---|---|---|
| | | या खाणीवर अवलंबून असून व्यवस्थितरित्या चालू आहे. | |
| १३ | श्री. देवेंद्र चिमनकर, दिघोरी (मोठी) | या ३५ एकर क्षेत्रामध्ये गौणखनिज उत्पादन होत असून फक्त दोन टक्के लोंकाचाच फायदा असून उर्वरीत ९८ टक्के लोंकाचे नुकसान होत असून याची प्रशासनाने दखल घेतली पाहिजे. मोठया प्रमााणत गौण खनिजाची चोरी होत आहे. या 35 एकरच्या पट्टयात गौण खनिजाचे उत्खनन केल्याने त्याचा दुष्परिणाम येणाऱ्या पिढीला भोगावे लागणार आहे. सीएसआर फंड मधील कामे आमच्या गांवामध्ये केलेली नाही व सीएसआर फंड तंटपुंजा आहे. आतापर्यंत 20 हजार झाडे लावलेली असतील परंतु त्याच्या बदल्यात किती झाडे तोडली गेली याची माहिती देण्यात यावी. या क्षेत्रामध्ये बरेचशे कुंटूब तेंदूपत्ता संकलन करुन जगतात व या खाणीमुळे तेंदूची झाडे नष्ट होऊन त्यांचा रोजगार हिंरावला जाईल. बाहेरचे लोक येथे येऊन रात्रीला गौणखनिजाची चोरी करुन वाहतुक करण्यात येते, त्यावर काय उपाययोजना केली आहे. नियमानुसार काम झाले पाहिजे. | हि शाासकिय जमीन आहे. आतापर्यंत चार हजार झाडे लावलेले आहे अजुन भविष्यात झाडे लावणार आहोत. |
| १४ | श्री. रुपचंद देशमुख | या खाणीमुळे मला आठ महिने काम मिळते व माझे कुटुंबाचे उदर्निवाह होत. | समर्थन |
| १५ | श्री. शालिक सुर्यवंशी | माझी शेती या खाणीच्या जवळ आहे, या खाणीपासून आम्हाला कोणताही त्रास नाही. | समर्थन |
| १६ | श्री. चंद्रकांत कांबळे, दिघोरी मोठी | मी २००८-१९ पर्यंत या खाणीमध्ये कामावर होतो. मी पर्यावरणाविषयी, माझ्या बोनस व रोजगाराविषयी विचारले तर खाणमालकाने मला कोणतीच पूर्वसूचना न देता सकाळी 9 वाजता कामावरून बंद केले. २०/१२/२०१९ पासून ते आजपर्यंत ऐवढ्या दिवसाची रोजी व पी.एफ देण्यात यावा. | |
| १७ | श्री. हरिषचंद्र | या खाणीमुळे मला मागील पाच वर्षापासून रोजगार मिळत आहे. | समर्थन |
| १८ | श्री. मनोज आगाशे, दिघोरी मोठी | या खाणिमुळे मला काम मिळाले. | समर्थन |
| १९ | श्री. मनोज दुर्गे, दिघोरी मोठी | या खाणीमध्ये ज्यांना काम मिळाले ते खुश आहेत आणि आम्हाला काम मिळाले नाही आम्ही नाराज आहो. मागच्या २५ वर्षापासून खाण चालु असुन झाडे लावले नाही. खाण क्षेत्र कराराचे पालन केले नाही एका वर्षामध्येच मोठया प्रमाणात उत्खनन केले. पर्यावरणाचे नुकसान झाले. आमच्या ग्रामपंचायतीला काहीही मदत केली नाही. सगळ्या भूलथापा दिल्या गेल्या आहेत. खूप झाडे कापली गेली आहे. | |
| २० | श्री. महादेव मेश्राम, दिघोरी | मी अपंग असून मला या खाणीमुळे रोजगार मिळाला आहे. या खाणीमुळे शेतीचे नुकसान | समर्थन |

| | | | |
|---|---|---|---|
| | | झालेले नाही. | |
| २१ | श्री. पंकज पराते दूरदृश्य प्रणालीव्दारे (ऑनलाईन) | या खाणीमुळे कोणत्याही प्रकारचे प्रदूषण आढळलेले नाही, काही हरकत नाही. | समर्थन |
| २२ | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, नागपूर | खनिजाची वाहतूक करण्याचा रस्ता गावातून जातो कि बाहेरून? आणि दिवसातून खनिजाची वाहतूक करायला किती गाडया जातात? | खनिजाची वाहतूक गावाच्या बाहेरील रस्त्यावरून होते आणि दिवसाला 2 गाडया चालतात. |

**मा. जिल्हाधिकारी, भंडारा व अध्यक्ष लोकसुनावणी समिती**

आजच्या जनसुनावणीमध्ये काही प्रश्न, सुचना मौखिक व लेखी स्वरुपात प्राप्त झालेले आहे. सर्व आक्षेपाची, सुंचनांची इतिवृत्तामध्ये सविस्तर नोंद घेण्यात येईल. खाण प्रवर्तकानी दिलेल्या उत्तरांची सुध्दा नोंद घेण्यात येईल. प्राप्त लेखी, मौखिक सुचना, आक्षेप, व आजच्या कार्यक्रमाचे इतिवृत्त व व्हिडीओ रेकोडिंग पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल. खाणप्रवर्तकांनी त्यांच्या स्तरावर सुंचनाचे/आक्षेंपाचे निराकरण करण्याबाबत सजग असावे, आश्वासित मुद्दे तसेच पर्यावरणासाठी करावयाच्या उपाययोजना यांची काटेकोरपणे अंमलबजावणी होईल याची दक्षता घेतली पाहिजे.

**(किशोर पुसदकर)**
**उप-प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि.मंडळ, भंडारा व**
**समन्वयक, लोक सुनावणी समिती**

(हेमा देशपांडे)
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, नागपूर व
सदस्य, लोक सुनावणी समिती

(योगेश कुंभेजकर)(भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी व
अध्यक्ष, लोक सुनावणी समिती